जानेवारी २०१२ खंड ५ अंक १

श्री राम चंद्र मिशन®

India ECHOES
ONE WORLD ONE HUMANITY

२०१२


# नववर्षाभिनंदन!



अनेक दिवसांपासून असलेल्या नीरस व पावसाळी हवामानानंतर दि. १ जानेवारी २०१२ रोजी आकाश निरभ्र होते. गेल्या दोन दिवसांमध्ये झालेल्या पावसामुळे वातावरणांत ताजेपणा भरून राहिला होता. आपल्या प्रिय गुरुदेवांची एक झलक मिळावी व वचनबद्धतेने आणि प्रयत्नपूर्वक नवीन सुरुवात करावी या हेतूने आलेल्या अभ्यासींनी आश्रम पूर्ण भरुन गेला होता. सत्संग सुरु होतेवेळी हवामान अतिशय चांगले होते परंतू पू. गुरुदेवांनी "दॅट्स ऑल" म्हणतांच पावसाला सुरुवात झाली. रिमझिम सुरु झालेल्या पावसाने नंतर चांगलाच जोर पकडला व मुसळधार पाऊस सुरु झाला. त्यामुळे पू. गुरुदेवांना आम्हा सर्वांसोबत ध्यानगृहामध्येच थांबावे लागले. यावेळी तामिळमधून बोलतांना बंधू चक्रपाणी म्हणाले "ज्याप्रमाणे आई आपल्या लहान बाळाला पहिले पाऊल टाकतांना मदत करते व ते बघून आनंदित होते त्याप्रमाणे पू. गुरुदेवदेखील आपल्याला मदत करतात व आपली प्रगती पाहून आनंदित होतात". ते पुढे म्हणाले की "एकदा आपली प्रगती झाली की त्यांना त्रास न देता व आपल्याविषयी काळजी करायला न लावता, आध्यात्मिक मार्गावर चालणारे आपण एक जबाबदार वयस्क आहोत आणि आपण आपली काळजी घ्यायला समर्थ आहोत हे गुरुदेवांना दाखवून देणे हे आपले कर्तव्य आहे." त्यानंतर भगिनी निहारिका यांनी त्यांच्या काही कवितांचे वाचन केले. यावेळी पूज्य गुरुदेवांविषयीच्या प्रेमाने सर्वांची हृदये ओतप्रोत भरुन गेली. अजूनही पाऊस सुरुच होता परंतु गुरुदेव त्यांच्या कुटिरामध्ये परतले.

संपूर्ण दिवसभर पू. गुरुदेवांना विविध गटांमधील अनेक अभ्यासींना भेटण्यासाठी विशेष परिश्रम करावे लागत होते. त्यांच्या रात्रीच्या जेवणाच्या वेळेपर्यंत ते अतिशय थकून गेले होते व त्यांच्याकडे पाहणाऱ्या कुणाच्याही ते सहज लक्षात येत होते. असे असूनसुद्धा जेवणानंतर ते काही लहान मुलांना भेटले व त्यानंतर त्यांच्या आरामाची वेळ असूनही त्यांनी आपल्या कार्यालयात जाऊन सुमारे ३० मिनिटे त्यांच्या ईमेल वर काम करण्यात घालविली. आपण सर्वांनी पाहून अनुकरण करावे असे आदर्श जीवनाचे उदाहरण ते स्वत: आपल्यासमोर प्रस्तुत करीत आहेत. 'आपण त्यांचे अनुकरण करीत आहोत का?' हा प्रश्न आपण सर्वांनी स्वत:ला विचारला पाहिजे.

## पूज्य बाबूजींकडून प्रेमपूर्वक



दि. २२ डिसेंबर २०११ रोजी बाबूजींनी पूज्य गुरुदेवांना पाठविलेल्या संदेशात त्यांनी गुरुदेवांना त्यांच्या जीवनपद्धतीमध्ये बदल करण्याची विनंती केली आहे. यामुळे गुरुदेवांनी त्यांची उत्तर भारताची यात्रा रद्द केली असून ज्यांना गुरुदेवांची भेट घ्यायची आहे त्यांच्याकरिता ते मणपाक्कम येथे उपलब्ध असतील. पूज्य बाबूजींच्या संदेशाचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

"गेल्या अनेक वर्षांपासून तू स्वत:ला इतके वाहून घेतले आहेस की, आता तुझी जीवनपद्धती, जी एका थकलेल्या भौतिक शरीराची वास्तविकता लक्षात घेता अजिबात योग्य नाही, तिच्यात बदल करण्याची वेळ आली आहे. शक्य ती सर्व काळजी, विश्रांती, स्थिरचित्तता व तुझ्या दिव्य व्यक्तिमत्वाचे शरीराकडे आवश्यक ते लक्ष असणे हा तुझ्या शरीराचा हक्क आहे.

... तू कमाल मर्यादेपर्यंत स्वत:ला वाहून घेतले आहेस. तुला अधिक काय पाहिजे? या टप्प्यावर आता प्रवास करण्याची अजिबात आवश्यकता नाही. तुझे आरोग्य अशाप्रकारे संकटात टाकणे आम्हाला मान्य नाही. ही आजची सूचना आहे; ती आमच्या प्रेमाचे सर्वोच्च प्रकटीकरण आहे, कारण तुझे हित हे आमच्यासाठी इतर कुठल्याही गोष्टीपेक्षा अधिक महत्वाचे आहे."

(Please refer to the original version in the English newsletter.)



## पूज्य गुरुदेवांचा प्रवास वृत्तांत

### मुंबई

दि. २२ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी पू. गुरुदेवांचे दुबईहून आगमन झाले व विमानतळावरुन ते सरळ आश्रमात गेले. पू. गुरुदेव आश्रमांत प्रवेश करीत असतांना सर्वत्र उत्सवाचे वातावरण होते व मधुर गाण्यांचे स्वर त्यांचे अभिवादन करीत होते. पारंपारिक स्वागतानंतर त्यांनी तळमजल्यावरील पुस्तक विक्री केंद्राचे व वाचनालयाचे तसेच दुसऱ्या



मजल्यावरील नवीन कुटीराचे उद्घाटन केले. पू. गुरुदेवांनी संपूर्ण जागेची पहाणी केली व आपल्या समाधानाची पावती दिली. जरी ते फक्त एका रात्रीच्या मुक्कामासाठी व केवळ रविवार सकाळचा सत्संग करण्यासाठी आले होते, तरी मध्यरात्री त्यांनी अजून एक दिवस राहण्याचा व आश्रमामध्ये तीन सत्संग संचालित करण्याचा निर्णय घेतला.

रविवार दि. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वा. गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केले. यानंतर त्यांनी त्यांचे प्रतिनिधी बंधू कमलेश पटेल यांची सर्वांना ओळख करुन दिली. ओळख करुन देतांना बाबूजींच्या "माझ्यानंतर एक असेल" या वाक्याचा त्यांनी संदर्भ दिला व म्हणाले की विद्यार्थ्यांना शिक्षकाच्या निवडीचा अधिकार नसतो परंतु त्यांनी शिक्षकांकडून अधिकाधिक शिकण्यासाठी ह्या संधीचा वापर केला पाहिजे.

उपस्थितांना संबोधित करतांना बंधू कमलेश म्हणाले, "ध्यानादरम्यान गुरुदेव आपणांला जी अवस्था प्रदान करतात ती अनुभवण्यासाठी एक अभ्यासी म्हणून आपण तयार आहोत का? अनुभवल्यानंतर ती स्वीकारण्यासाठी आपण तयार आहोत का? व स्वीकारल्यानंतर ती हालत किंवा अवस्था आपण कायम ठेऊन आपल्याबरोबर घेऊन जातो का?"

बंधू कमलेश यांच्या भाषणानंतर मुंबईच्या अभ्यासींद्वारे सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. संध्याकाळी ५ वा. सत्संग व त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. अनौपचारिकरित्या बोलतांना पू. गुरुदेवांनी अभ्यासींना मायेच्या जाळ्यात न अडकण्याचा सल्ला दिला. एका अभ्यासीने या जाळ्यातून कसे बाहेर पडायचे हे विचारले असता ते म्हणाले की केवळ प्रार्थना तुम्हाला या परिस्थितीतून बाहेर काढू शकते.

दि. २४ ऑक्टोबर रोजी सकाळी ७.३० च्या सत्संगानंतर गुरुदेवांनी अभ्यासींची आध्यात्मिक अवस्था व त्यांनी दाखविलेल्या शिस्तीची प्रशंसा केली. त्यानंतर त्यांनी मुंबईसाठी प्रस्थान केले. तेथे ते एका अभ्यासी बंधूंच्या घरी राहिले व तेथे त्यांनी संध्याकाळच्या सत्संगाचे संचालन केले. दि. २५ ऑक्टोबर रोजी सकाळी पू. गुरुदेवांनी अहमदाबादसाठी प्रस्थान केले.

## अहमदाबाद

पू. गुरुदेवांची भारताच्या पश्चिम भागाची यात्रा, दिवाळी व गुजराती नववर्षाच्यावेळी असल्याने ती गुजरातच्या अभ्यासींसाठी एक विशेष भेट होती. त्यांचे दुपारी विभागीय आश्रमात आगमन झाले त्यावेळी सुमारे ५०० अभ्यासींनी त्यांचे स्वागत केले. थोड्यावेळ विश्रांती घेतल्यानंतर, त्यांनी उपस्थित सुमारे ३००० अभ्यासींसाठी सत्संगाचे संचालन केले व त्यानंतर एका छोटेखानी भाषणात ते म्हणाले की त्यांच्या भेटीचा मुख्य उद्देश त्यांचे भविष्यातील प्रतिनिधी बंधू कमलेश पटेल यांची ओळख करुन देणे हा आहे.

दुसऱ्या दिवशी दिवाळी होती व बंधू कमलेश पटेल यांनी सत्संगाचे संचालन केले. सत्संगानंतर बंधू गुरप्रीत यांनी सादर केलेली काही सुश्राव्य भजने सर्वांना एका वेगळ्याच आध्यात्मिक आनंदाच्या पातळीवर घेऊन गेली. संध्याकाळी संपूर्ण आश्रमात सगळीकडे लावलेल्या हजारो दिव्यांच्या रोषणाईने परिसर उजळून गेला होता. संध्याकाळच्या सत्संगानंतर अहमदाबाद व बडोद्याच्या अभ्यासी भगिनींनी पारंपारिक गरबा नृत्य सादर केले. दिव्य प्रेमाचा आवेग संपूर्ण वातावरण व्यापून होता व सगळ्यांनाच त्याचा अनुभव येत होता.

दि. २७ ऑक्टोबर म्हणजे गुजरातचा नववर्ष दिवस. राज्यातील प्रथेप्रमाणे तीन लहान मुले गुरुदेवांकडे मीठ घेऊन 'सबरस' म्हणजे नूतन वर्षाभिनंदन करण्यास गेली होती. गोल्फकार्टमधून ध्यानकक्षाकडे जातांना त्यांना अभिवादन करण्यासाठी रांगेत उभ्या असलेल्या सुमारे १०० लहान मुलांना गुरुदेव भेटले. गुरुदेवांनी सत्संगाचे संचालन केल्यावर अहमदाबादमधील एका जोडप्याचा विवाह संपन्न केला.

## गुरुदेवांबरोबरील अनौपचारिक संभाषणादरम्यान टिपलेली मौक्तिके

- जेव्हा कुणीतरी गुरुदेवांना स्वत:ची ओळख करुन दिली तेव्हा ते म्हणाले की आपल्या जवळच्या माणसांना व प्रियजनांना आपली ओळख करुन द्यायची गरज नसते.
- परिणामांविषयी विचारले असता ते म्हणाले की अभ्यासींची संख्या वाढण्याची अपेक्षा करणे चुकीचे आहे. आपण फक्त आपले काम मनापासून केले पाहिजे.
- जीवनामध्ये सुखसोयींचा वापर करणे योग्य आहे का? असा प्रश्न कोणीतरी गुरुदेवांना विचारला. यावर ते म्हणाले की जर कोणी सुखसोयींशिवाय राहू शकत नसेल तर ते चुकीचे आहे. पण जर आपण असा विचार केला की उपलब्ध असणाऱ्या कुठल्याही सुखसोयींचा







अहमदाबाद



आणंद



वडोदरा

वापर अध्यात्मामध्ये करू नये, तर तो देखील ताठर आणि चुकीचा मार्ग असेल. त्यांनी स्पष्टीकरण दिले की आपण बंधमुक्त राहिले पाहिजे आणि त्यामुळे कुठल्याही परिस्थितीत आनंदी असले पाहिजे.

संध्याकाळच्या सत्संगानंतर अहमदाबाद केंद्राने दोन मनोहारी कार्यक्रम सादर केले. एक होते संत नरसिंह मेहता यांच्या जीवनावरील नाटक व दुसरे होते मशाल नृत्य. गुरुदेवांनी हे कार्यक्रम आपल्या कुटीरात सी.सी.टी.व्ही. द्वारे पाहिले आणि त्यांचे कौतुक केले. ते प्रसन्न मनस्थितीत होते. हे कार्यक्रम सादर करणाऱ्या युवकांसोबत काही वेळ व्यतीत केल्यावर ते विश्राम करण्यास गेले.

दि,२८च्या सकाळी ६.३० वाजता गुरुदेव आणंद येथे (अहमदाबाद पासून ७५ कि.मी. अंतरावर) जाण्यासाठी निघाले. त्यांच्या सोबत १०००पेक्षा अधिक अभ्यासी होते. त्यांनी आणंद येथे सत्संगाचे संचालन केले आणि एका बंधूंच्या घरी दिवस व्यतीत केला. गुजरात मधील सर्व प्रशिक्षकांसाठी तसेच राजस्थान, मध्यप्रदेश व महाराष्ट्र या तीन राज्यातील निवडक अधिकाऱ्यांकरिता एका जी.एस.टी (GST) कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

दि. २९ रोजी आणंद येथे सत्संगाचे संचालन करून गुरुदेव वडोदरा आश्रमास जाण्याकरिता रवाना झाले. सप्ताहाच्या अखेरीस गुरुदेवांच्या सहवासात राहण्यासाठी चार राज्यातील जवळपास २५०० अभ्यासी जमले होते. गुरुदेवांनी दि.२९ रोजी संध्याकाळी व दि.३० रोजी सकाळी तसेच संध्याकाळी सत्संगांचे संचालन केले. वडोदरा येथील अभ्यासी भगिनी व काही मुलांनी दोन नृत्ये सादर केली. दि. १ नोव्हेंबर रोजी सकाळी ७.३० वाजता गुरुदेवांनी कुटीरामध्ये सत्संगाचे संचालन केले. त्यानंतर ते अहमदाबादला परत आले व दि. २ नोव्हेंबर रोजी दुपारी ३.२० वाजता चेन्नईस रवाना झाले.



## चेन्नई

दीर्घ प्रवासानंतर गुरुदेव चेन्नईस परतले. भरपूर रहदारी असल्यामुळे आश्रमात पोहोचण्यास त्यांना बराच उशीर झाला. ते थकलेले दिसत होते तरीसुध्दा दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजता उठून ते तयार होते. ते म्हणाले, "मला सकाळी ५ वाजता जाग आली. दमलेला असल्यामुळे मी विचार केला की मी ७ वाजेपर्यंत झोपेन. पण नंतर माझ्या लक्षात आले की हा थकवा नाही तर केवळ आळशीपणा आहे आणि म्हणून मी तो दूर झटकला व उठलो." हा आपणा सर्वांसाठी धडा आहे की या वयात आणि विशेषत: इतक्या दीर्घ प्रवासानंतर सुध्दा आपल्या इच्छाशक्तीचा वापर गुरुदेव स्वत:ला उत्साहित करण्यासाठी आणि पुन्हा नेहमीचे काम सुरू करण्यासाठी करू शकतात.

नुकत्याच केलेल्या प्रवासात मिळालेल्या विविध पुस्तकांचे वर्गीकरण गुरुदेव आश्रमाच्या ग्रंथालयास, त्यांच्या कक्षासाठी, ओमेगा शाळेस व सत्खोल आश्रमास देण्यासाठी करत होते. स्वयंसेवक पुस्तकांची शीर्षके वाचून गुरुदेवांना या कामात मदत करीत होते. अतिशय दक्षपणे, गरजेनुसार व समर्पकतेनुसार पुस्तकांचे वर्गीकरण करताना गुरुदेव दृष्टीस पडत होते.

दि. ५ नोव्हेंबर च्या आसपास चेन्नई येथे भरपूर पाऊस पडला. लायन्स गेट मधून कुटीराच्या आसपास पाणी भरण्यास सुरुवात झाल्यामुळे पुराचा धोका निर्माण झाला होता. अभ्यासी स्वयंसेवकांनी फाटकातून पाणी आत येऊ नये म्हणून वाळूची पोती रचली होती. गुरुदेवांना



परिस्थितीची काळजी वाटत होती. त्यामुळे सावधगिरीच्या हेतूने त्यांनी स्वयंसेवकांना पुस्तकांच्या कपाटातील सर्वात खालील कप्प्यातील पुस्तके खोक्यात बंद करुन उंचावर ठेवण्याच्या सूचना दिल्या.

दि. ७ नोव्हेंबरच्या संध्याकाळी मॉरीशस मधील अभ्यासींनी गुरुदेवांची भेट घेतली. त्यांनी एक सिटींग दिली व अभ्यासींसोबत थोडा वेळ संभाषण केले. ते म्हणाले, "आपण काही प्राप्त केले आहे असे कोणीही गृहीत धरू नये. प्रत्येक बाब ही पुढील बाबींची सुरुवात असते. आणि या प्रक्रियेला कधीही अंत नसतो."

दि. ११ नोव्हेंबर हा एक विशेष दिवस होता कारण गुरुदेवांनी सकाळी ९ वाजता सत्संगाचे संचालन केले व १३ विवाह संपन्न केले. ध्यान–कक्ष संपूर्णपणे भरलेला होता व सर्वांना त्यांच्या आवडत्या गुरुदेवांना जवळून पाहण्याची संधी मिळाली होती. आनंदाने भरलेल्या वातावरणाची अनुभूती प्रत्येक उपस्थिताला जाणवत होती. गुरुदेव अतिशय उत्साही मन:स्थितीत होते.

गुरुदेवांसोबत राहण्यासाठी आलेल्या शाहजहानपूरच्या २५–३० अभ्यासींची त्यांनी भेट घेतली. बैठकीची सुरूवात सिटींगने झाली. सर्वांसाठी अल्पोपाहाराची व्यवस्था करण्यात आली होती. प्रत्येकाला अल्पोपाहार मिळाला की नाही याची खात्री करुन घेणारे गुरुदेव परिपूर्ण यजमान होते. अभ्यासी गुरुदेवांना शाहजहानपूरला येण्यासाठी पुन:पुन्हा आग्रह करत होते तेव्हा गुरुदेव म्हणाले,"मी नक्की येईन". गुरुदेवांनी तेव्हा नुकतीच शाहजहानपूरसह उत्तर प्रदेशातील विविध भागांचा दौरा करण्याची योजना आखली होती. परंतु त्या आठवडाभरात तीन वेळा त्यांची प्रकृती बिघडली. त्यामुळे त्यांचा प्रवासाचा बेत रद्द करण्यात आला आणि ते मणपाक्कम मधेच राहिले.

एके दिवशी सकाळी गुरुदेव त्यांच्या समवेत बसलेल्या अभ्यासींना सिटींग देणार होते. तेव्हा ते म्हणाले, "मोह टाळण्याचा सर्वात उत्तम उपाय म्हणजे मोह होईल अशा जागी न जाणे. समजा तुम्हाला जिलेबी खाण्याचा मोह झाला, आणि जर तुम्ही जिलेबीच्या दुकानात असाल तर तुम्हाला नक्की ती खाण्याची इच्छा होणारच. म्हणून उत्तम मार्ग म्हणजे जेथे मोह होईल अशा ठिकाणी न जाणे."

दि. २७ नोव्हेंबरला मुसळधार पाऊस असून सुध्दा गुरुदेव सत्संगाचे संचालन करण्यास तयार होते. आश्रमातील पूरस्थितीची शक्यता परत एकदा वाढली होती आणि त्याबाबत ते चिंतेत होते. ते म्हणाले, "आश्रम बांधत असताना माझ्याकडे जर जास्त पैसे असते तर मी संपूर्ण आश्रम अजून काही फूट उंचावर बांधला असता." जेव्हा गुरुदेव हे स्पष्ट करून सांगत होते तेव्हा त्यांच्या साधेपणाची आणि सच्चेपणाची जाणीव होत होती.

अमेरीकेतून नुकत्याच परत आलेल्या एका अभ्यासी जोडप्याने गुरुदेवांची भेट घेतली. गुरुदेवांनी त्या मुलीस विचारले,"परत येण्याच्या या निर्णयावर तू समाधानी आहेस का?" मुलीने उत्तर दिले, "होय गुरुदेव, मी खूप समाधानी आहे." गुरुदेव म्हणाले, "तेथे तुम्हाला पैसे मिळतात आणि येथे तुम्हाला समाधान मिळते. पैसे व समाधान कधीही एकत्र नांदत नाहीत."

दि.२९ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत गुरुदेवांचा मुक्काम 'गायत्री' या त्यांच्या निवासस्थानी होता. शुक्रवारी संध्याकाळी ते समद्र किनाऱ्यावर गेले परंतु श्वसनास त्रास होऊ लागल्यामुळे त्यांना विश्रांतीकरिता घरी परतावे लागले.

**डिसेंबर ३, २०११:** सकाळी ९.१५ वाजता गुरुदेवांचे आश्रमात आगमन झाले. त्यांना 'महाभारत कथा' या डीव्हीडीचा संच मिळाला. तो या महाकाव्याचा दुसरा भाग असून त्यात मूळ महाभारताच्या मालिकेमधून वगळण्यात आलेले अनेक भाग अंतर्भूत केलेले होते. गुरुदेवांनी ते पाहण्याची तीव्र उत्सुकता दर्शविली.

गुजरात मधील सुमारे ३०० अभ्यासी डिसेंबर मधील पहिल्या आठवड्यात गुरुदेवांसोबत राहण्यासाठी आश्रमात आले होते. एका संध्याकाळी इटली मधील सुमारे २० अभ्यासीचा समूह संध्याकाळच्या सत्संगानंतर गुरुदेवांना भेटण्यासाठी सभागृहात आला. ते शांतपणे प्रतीक्षा करत होते आणि तेथे तयार झालेल्या वातावरणाची अनुभूती उपस्थितांना होत होती.


गुरुदेवांचा त्यांच्या कार्यालयात जाऊन काम करण्याचा बेत होता पण शयनकक्षाच्या बाहेर येताच त्यांनी विचार बदलला आणि सभागृहात येऊन इटलीहून आलेल्या अभ्यासींसमवेत त्यांनी संभाषण केले. थोडावेळ त्यांच्याबरोबर बातचीत केल्यानंतर सिटींग दिल्याने सर्वांना सुखद आनंद वाटला.

दि. १० व ११ रोजीच्या सप्ताह समाप्तीच्या "ह्रदयीचे बोल" या कार्यशाळे मध्ये पुढे आलेला एक प्रश्न गुरुदेवांपुढे मांडण्यात आला. " 'ह्रदयापासून बोल' असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा त्याचा अर्थ असा आहे का की आपण तयारी करुन न बोलता उत्स्फूर्तपणेच बोलावे?" गुरुदेव म्हणाले, कोणत्याही भाषणाला तयारी अत्यंत आवश्यक आहे. भाषणाच्या १–२ दिवस आधी त्या भाषणाचा विचार तुमच्या मनामधे स्थिरावला पाहिजे. त्याला आत मध्ये पूर्ण शिजू द्या. पाश्चिमात्य देशांत करतात तसे बोलायचे मुद्दे कागदावर लिहू नका. तसे केल्याने आराखडा ताठर व दुराग्रही होऊन त्यामधील स्वाभाविकपणा संपुष्टात येतो. त्यापेक्षा त्या विषयाला सहजपणे आत मध्ये राहू द्या व तुमच्या आतमध्ये तयारी सुरु राहू द्या. जेव्हा बोलण्याची वेळ येईल तेव्हा तुम्ही ह्रदयापासून बोलू शकाल. फक्त ह्रदयापासून बोलणे पुरेसे नाही, तर त्यात स्वत:चा जीव ओतणेही आवश्यक आहे असेही ते म्हणाले.

दि. १५ रोजी ओंगोल केंद्राहून आलेल्या अभ्यासींकरिता सत्संगाचे संचालन करण्यासाठी गुरुदेव दिवसभरासाठी गायत्री मधून आश्रमात आले.


Shri Ram Chandra Mission

# एकोज इंडिया वार्तापत्र



डिसेंबर १९, २०११ साऊथ आफ्रिका व ओशिॲनिया येथील अभ्यासी एका कार्यशाळेसाठी आश्रमात आले होते. सकाळी आठ वाजल्यापासून ते साडेअकरा वाजेपर्यंत गुरुदेवांनी अभ्यासींची भेट घेतली. स्वत: अत्यंत थकलेले असूनही त्यांना सर्वांना भेटण्याची इच्छा होती. 'साडेतीनशे पैकी तीनशे जणांना तरी मी आधीचा भेटलो असेन' असे ते विनोदाने म्हणाले. संध्याकाळीसुद्धा सुमारे ५० अभ्यासी दिवाणखान्यात गुरुदेवांना भेटण्यासाठी थांबले होते. आपल्या कार्यालयातून बाहेर येताना गुरुदेवांचे त्यांच्याकडे लक्ष गेले, 'कृपया धीर धरा, मी काही मिनीटांत येतो' असे त्यांनी उपस्थितांना संगितले. काही वेळानंतर तेथे येऊन त्यांनी सर्वांना सिटींग दिली. सुमारे तासभर धीराने वाट पाहणाऱ्या सर्वांकरिता हा एक उदात्त अनुभव होता.

डिसेंबर २४, २०११ :आश्रमात आगमन झाल्यावर गुरुदेवांनी सूर्यप्रकाशात बसून अभ्यासींशी वार्तालाप केला. पूज्य बाबूजी महाराजांकडून प्राप्त झालेल्या नवीन संदेशाबद्दल ते सांगत होते. या पुढच्या प्रवासाचे गुरुदेवांनी नियोजन केलेले होते व तिकिटे आरक्षित करण्याआधी त्यांना बाबूजींचा संदेश मिळाला असे स्पष्टीकरण त्यांनी दिले. आपल्या गुरुदेवांच्या आदेशाचे पालन करण्यासाठी त्यांना स्वत:चे प्रवासाचे बेत रद्द करावे लागले.

नाताळच्या आधीच्या संध्येचे औचित्य साधून अभ्यासींच्या एका गटाने गुरुदेवांच्या कुटीरात 'नाताळ–गीतांचं' गायन केले. जेव्हा त्यांनी गायन सुरू केले तेव्हा गुरुदेव गाण्याची धून गुणगुणत आपल्या विश्रामकक्षातून बाहेर आले. हे पाहून उपस्थितांना सुखद आश्चर्य वाटले. 'हे गाणे मी क्रेस्ट येथे ऐकले होते' असे ते यावेळी म्हणाले. अभ्यासींबरोबर काही काळ व्यतीत केल्यावर त्यांनी सर्व गायकांना गोड गोळ्या वाटल्या.

दिनांक २५ रोजी गुरुदेव ध्यानकक्षाकडे जात असताना लाल व पांढरे पोषाख घातलेली मुले आश्रमातील रस्त्यावर त्यांच्या स्वागताकरिता उभी होती. आपल्या गोल्फ–गाडीचा वेग कमी करून तेथून जात असताना गुरुदेव प्रसन्न दिसत होते.

डिसेंबर २६ :गुरुदेवांच्या प्रवासावर असणाऱ्या निर्बंधांमुळे जेव्हा वेळ मिळेल तेव्हा सकाळी ९ वाजताच्या सत्संगाचे संचालन करण्याचे गुरुदेवांनी ठरविले आहे. ध्यान–कक्षामध्ये सर्वांची भेट घेण्याचा ते मनापासून प्रयत्न करतील, तेव्हा अभ्यासींनी तेथे यावे, कुटीरामध्ये गर्दी करू नये असे ते पुढे म्हणाले.

सकाळच्या एका सत्संगानंतर गुरुदेवांनी उन्हात बसून बराच वेळ उपस्थितांशी संभाषण केले."पन्नाशीनंतर इच्छाशक्तीचा ऱ्हास का होतो? कारण स्वत:चा उत्कर्ष करण्यासाठी इच्छाशक्ती वापरण्याऐवजी आपण ती वासनांच्या पूर्ततेसाठी वापरतो, त्यामुळे ती कमकुवत होते." छोट्या मुलाचे उदाहरण देऊन ते म्हणाले, "एखाद्या बालकाला खेळण्याच्या दुकानात घेऊन जाऊन आपल्या इच्छांवर अंकुश ठेवायला सांगू नये" स्वत:चे उदाहरण देताना ते म्हणाले की सुमारे एक वर्षापूर्वी त्यांना सकाळी लवकर उठता येत नव्हते, ते उशीरापर्यंत झोपून रहात असत. यावर मात करण्याचे त्यांनी ठरवले, आणि सध्या सकाळी ४.३० ते ५ च्या दरम्यान त्यांना जाग येते. ते पुढे म्हणाले, "माझी इच्छाशक्ती प्रबळ असल्यामुळेच मी आज उभा आहे, नाहीतर माझ्या वयाचा माणूस कोसळलाच असता. मी नियमितपणे सकाळी एक–दोन सिटींग देतो, एखाद–दुसरे प्रशिक्षक सिटींग, सकाळच्या सत्संगाचे संचालन, याशिवाय माझ्या ई–मेल पाहणे– थोड्या–थोडक्या नव्हेत तर ४०च्या आसपास."

पूर्व किनाऱ्याला बसलेल्या वादळाच्या तडाख्यामुळे मुसळधार पाऊस व वारा यांचा फटका चेन्नई शहराला बसला. आश्रमाचा परिसर पाण्याने चिंब भिजला होता व पूरसदृष्य परिस्थितीचा धोका निर्माण झाला होता. अनेक अभ्यासी आश्रमात येण्यास सुरुवात झाली होती. त्यामुळे अभ्यासींनी मणपाक्कम येथे येऊ नये असे परिपत्रक जारी करण्यात आले. सुदैवाने वादळाचा धोका टळला व गोष्टी मूळपदावर आल्या.







## मॉरिशिअसच्या अभ्यासींसाठी कार्यशाळा

### दि. ७ ते १४ नोव्हेंबर २०११

दि. ६ नोव्हेंबर रोजी २७ अभ्यासी व ८ मुलांचा एक समूह मणपाक्कम आश्रमामध्ये येऊन पोहोचला. ७ नोव्हेंबर रोजी गुरुदेवांनी त्यांचे आपल्या निवासस्थानामध्ये स्वागत केले व सायंकाळी ४:४५ वाजता एक सिटींग दिले. त्यानंतर चहा व अल्पोपाहार झाला.

या कार्यशाळेमध्ये प्रत्येकाला दोन वैयक्तिक सिटींग मिळाली. दि. ८ ते १३ नोव्हेंबर दरम्यान स्व–अवलोकनासाठी व सामूहिक चर्चांसाठी काही विषय दिले गेले. ते लाभदायी ठरले व त्यामध्ये भगिनी डॉली व प्रशिक्षण संघाने सहज मार्ग साधना पद्धतीवर प्रस्तुत केलेल्या सादरीकरणाचा समावेश होता. त्यात चर्चासत्रांचाही अंतर्भाव होता व प्रत्येक अभ्यासीला चर्चेच्या विषयाबद्दल आपली समज व्यक्त करण्याची संधी मिळाली. विविध गटांनी सादरीकरणे सादर केली. दुपारच्या वेळी गुरुदेवांच्या भाषणाच्या चित्रफिती दाखविण्यात आल्या.

बंधू व्ही कन्नन, ए. पी. दुरै, आणि कमलेश पटेल यांनी याप्रसंगी उपस्थितांना संबोधित केले व सहजमार्गाबद्दलची जाणीव संपन्न केली. आध्यात्मिक प्रगती व सहजमार्गाचा प्रसार मॉरिशिअस मध्ये करण्याची प्रेरणा त्यांनी उपस्थितांना दिली. बंधु शरत यांनी 'सामाजिक संघटन' यावर एक सादरीकरण केले व मॉरिशिअसमध्ये (सहज–मार्गाच्या) सुरुवातीच्या पायऱ्या काय असाव्यात यावर चर्चा व संमती झाली.

बंधू कमलेश पटेल आपल्या भाषणात म्हणाले की, माघारी घरी गेल्यानंतर देखील आपली आंतरिक स्थिती कायम कशी ठेवावी अशी अनेक अभ्यासींची शंका असते. त्यांनी सांगितले की, आपण त्या आंतरिक स्थितीची वाढ होऊ दिली पाहिजे. त्या स्थितीची वृद्धि होऊन तिचे प्रकटन आपल्या दैनंदिन जीवनामधील विचारांत, बोलण्यात व आचरणात झाले पाहिजे. ते पुढे असे म्हणाले की नवीन अभ्यासींना मिशनमध्ये घेऊन येणे व त्यांचा पाठपुरावा करणे हेही प्रत्येक अभ्यासीचे कर्तव्य आहे.

१४ नोव्हेंबर रोजी अभ्यासींनी गुरुदेवांची धावती भेट घेतली व गुरुदेवांनी त्यांना सुखद प्रवासाच्या शुभेच्छा दिल्या. ते म्हणाले की त्यांच्या वयामुळे ते मॉरिशिअसला येऊ शकले नाहीत. "मला तुमच्यासमवेत घेऊन जा. माझ्या बोलण्याचा गर्भितार्थ तुम्हाला समजला असेल ही मी आशा करतो" अशी गुरुदेवांनी त्यांना विनंती केली. आपण संपूर्ण वेळ त्यांच्या समवेतच राहिले पाहिजे याची आपल्याला यामुळे आठवण होते.

## ओशिॲनिया आणि द. आफ्रिका परिसंवाद

### १६ ते २२ डिसेंबर २०११

### "मी नेहमीच त्यांचा होतो, परंतु ते कधी माझे होते का?"

सहभागींच्या आगमनानंतर जवळजवळ दोन दिवस त्यांना गुरुदेवांचे दर्शन झाले नाही. यात मूक संदेश हाच होता की, गुरुदेवांना अंतर्मुख होऊन आपल्या आतमध्ये शोधा आणि त्यांच्या अस्तित्वाची अनुभूती घ्या. 'त्यांना आतमध्ये शोधा' याचा खरा अर्थ उघड करुन "आपण त्यांचा पूर्णपणे स्वीकार केला आहे का?" हा प्रश्न स्वत:ला विचारणे हे या परिसंवादाचे प्रमुख विषयसूत्र होते.

रविवारी दि. १८ रोजी गुरुदेवांनी सत्संग संचालित केला आणि कार्यक्रमांची सुरुवात प्रोत्साहित करणाऱ्या वक्त्यांच्या भाषणाने झाली. बंधु संतोष यांनी 'हृदयीचे बोल' यावर उपस्थितांना संबोधित केले. आपणही गुरुदेवांच्याच नजरेप्रमाणे द्रष्टा झाले पाहिजे व आपल्या सर्वांच्या वेगवेगळ्या दृष्टी असता कामा नयेत असेही नमूद केले गेले. दुसऱ्या दिवशी बंधू कृष्णा यांनी 'बंधुभाव' यावर बोलताना आपण गुरुदेवांच्याच सादाला प्रतिसाद देणे का महत्त्वाचे आहे याबद्दल सांगितले. दि.२० रोजी बंधू कमलेश यांनी साधनेच्या नियमिततेवर भर दिला.

दि २१ डिसेंबर रोजी, गुरुदेव ऑस्ट्रेलिया व न्यूझिलॅंडच्या वार्षिक मीटींग (ए.जी.एम. AGM)ला उपस्थित होते. राष्ट्रीयतेच्या बंधनांना तोडून टाकून आपण सर्वांनी एक झाले पाहिजे असे ते या प्रसंगी म्हणाले. स्वप्न व सत्य याबद्दल बोलताना ते म्हणाले की, त्यांना नेहमीच ऑस्ट्रेलियाच्या समुद्रातटावरून वाहन चालवायचे स्वप्न होते व सत्य असे आहे की ते आता वयस्कर झाले आहेत व आता ते प्रवास करू शकत नाहीत. म्हणून आपण स्वत:च्या जीवनातील काल्पनिकता आणि वास्तविकता काय यांना जाणले पाहिजे. गुरुदेवांनी सहभागींसमवेत रात्रीचे भोजन केले व त्यांचासाठी खासकरुन बर्गर व चिप्स यांची योजना केली.

दि १७ ते दि २० डिसेंबरच्या दरम्यान 'त्यांच्या पाऊलखुणांवर चालवे' या केंद्रविषयावर आधारित सुमारे ८० युवकांसाठी ओशनिया आणि द. आफ्रिका युवासंमेलन आयोजिले होते. सहभागी युवक न्यूझिलँड, द. आफ्रिका, ऑस्ट्रेलिया या देशांतून व काहीजण भारतामधून आले होते.

चार दिवसाच्या या संमेलनामध्ये भाषणे, उपक्रम व सत्संगांचा समावेश होता. शेवटच्या दिवशी प्रत्येक गटाने नाटिका, गाणी वा काही कार्यक्रम सादर केले. हृदयाचा हृदयाशी संवाद असल्याने सर्वांनाच एकमेकांशी खुलेपणाने बोलण्यास उत्तेजन मिळाले. आपण सर्व एकच आहोत या भावनेला बळ मिळाले. उपस्थित युवकांना एकमेकांशी संवाद करण्यासाठी, आपले विचार व दृष्टीकोन मांडण्यासाठी संधी मिळाल्याने आनंद झाला. गुरुदेव आपल्याला जसे बनवू इच्छितात तसे बनणे व एकत्रितपणे मिळूनमिसळून प्रेमाने काम करणे यावर यापुढे भर राहील.



## अभ्यासींचे खुले चिंतन

### रांची, झारखंड

दि. २८ ऑक्टोबर २०११ रोजी रांची केंद्रातील अभ्यासींकरिता परस्पर-संवादाचे एक सत्र आयोजित करण्यात आले होते. सहभागींची तीन गटात विभागणी करून रांचीमधील अभ्यासींची गुणवत्ता व संख्या कशी वाढविता येईल यावर चर्चा झाली. या चर्चेमधून अनेक कृति-योग्य मुद्दे समोर आले. अभ्यासींना नियमितपणे वैयक्तिक सिटींग घेण्यासाठी, भंडाऱ्याला जाण्यासाठी व न चुकता रविवारच्या सत्संगाला जाण्यासाठी प्रोत्साहित करावे. तसेच योग्य प्रकारे, आधीपासून नियोजन करून संपूर्ण दिवसीय कार्यक्रम व एकत्रीकरणे आयोजित केली जावीत असे या वेळी ठरले. बंधू राकेश व भगिनी कांचन यांच्या 'प्रेमासहित सेवा' या विषयावरील भाषणांनी या कार्यक्रमाचा समारोप झाला.

## गृह सभा

### दुर्गापूर, पश्चिम बंगाल



दि. १३ नोव्हेंबर २०११ रोजी बंधू एन.पी. चक्रवर्ती यांच्या निवासस्थानी 'सहज मार्ग- साधना व पद्धति' या विषयावर परस्पर-संवादाचे सत्र आयोजित करण्यात आले होते. यामध्ये बंधू अरूण लाठिया, भगिनी अनिता जैन, बंधू परिमल व दुर्गापूर येथील काही अभ्यासी सहभागी झाले होते. सहज मार्ग साधनेबद्दल व अभ्यासींची गुणवत्ता सुधारण्याबद्दल अनेक मुद्दे चर्चिले गेले व त्यातून निर्माण झालेल्या प्रश्नांवर समाधानकारक उत्तरे शोधण्यात आली. गुरुदेवांच्या दिव्य आशीर्वादामुळे व उत्सुक अशा अभ्यासींमुळे या कार्यक्रमानंतर सर्वांना प्रगाढ अशा समाधानाचा अनुभव आला.

### नासिक, महाराष्ट्र

दि. ८ डिसेंबर रोजी बंधू सुनील चंद्रन यांच्या निवासस्थानी झालेल्या मेळावाच्या वेळी लष्करी अधिकारी, त्यांच्या पत्नी व शाळेतील शिक्षक अशा १२ व्यक्ती उपस्थित होत्या. 'सहज मार्गाचे महत्व व संतुलित जीवनाबरोबरच आध्यात्मिक प्रगती साध्य करण्यास सहज मार्ग कशा प्रकारे सहाय्य करतो' हे, भगिनी अनसूया रामचंद्रन, नासिक विभाग-प्रमुख, यांनी छोट्या गोष्टींमधून व उदाहरणे देऊन स्पष्ट केले. आध्यात्मिकतेच्या सर्व बाजूंबद्दल उपस्थितांनी कुतूहल दर्शविले व स्वानुभवावर आधारित अनेक प्रश्न व शंका उपस्थित केल्या. अनेक सहभागींनी स्थानिक प्रशिक्षकांशी संपर्क साधण्याबद्दल विचारणा केली. आवश्यक ती माहिती त्यांना देण्यात आली.



## समन्वय कार्यशाळा (Facilitated Workshops)

### मुंबई, महाराष्ट्र



"आशयापेक्षा पद्धति अधिक महत्त्वाची असते."

ऑक्टोबर २०११ मध्ये भारतातील तसेच परदेशातून आलेल्या सुमारे ६५ आयोजकांकरिता सखोल प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. 'समन्वय' किंवा 'Facilitation' ही अभ्यासींकरिता प्रशिक्षण कार्यक्रम संचालित करण्यासाठी प्रभावी पद्धति आहे. या पद्धतिमध्ये छोट्या गटांमध्ये काम करण्यास प्रोत्साहन दिले जाते, ज्यामुळे आत्मविश्वास निर्माण होतो. परस्पर विश्वास व आदराने युक्त असे वातावरण निर्माण केले जाते. त्यामुळे प्रत्येक सहभागीचे अंतर्मन खोलण्यास सहाय्य होते. विचारांची देवाण-घेवाण तरल असल्याने(ध्वनि-क्षेपकावरील भाषणांच्या विरुद्ध) ते आश्रमाच्या वातावरणाला साजेसे ठरते.

ही पद्धति वापरुन मुंबई व पुणे येथील प्रशिक्षित संघाने अभ्यासींकरिता (२० नोव्हेंबर, ६५ सहभागी) व प्रशिक्षकांकरिता (४ डिसेंबर, ३६ सहभागी) 'परस्पर-संवाद व बंधुभाव' या विषयावर दोन कार्यशाळांचे आयोजन केले होते.

या दरम्यान बरीचशी विचारांची देवाण-घेवाण ८ ते १० अभ्यासींच्या छोट्या गटांमध्ये होत होती. बंधुत्वाच्या भावनेने केलेल्या सूचना परस्पर-संवादाकरिता वापरल्या जात होत्या. आत्मपरिक्षणाकरिता वापरण्यात आलेली बहुतेक सर्व सामुग्री आपल्या सर्व गुरुंच्या लिखाणामधून तसेच व्हिस्पर्स फ्रॉम ब्राईटर वर्ल्ड यामधून घेण्यात आली होती. सहभागींचा प्रतिसाद अत्यंत उत्साहवर्धक होता. शिकण्याच्या क्रियेत जाणीवेला व बंधुत्वाला (सहज मार्गाचा ६वा नियम) प्राधान्य देण्यात आले होते व विचार करणे/ समजणे यांना फारसे महत्व दिले गेले नव्हते.

## चिंतनाचा समय



### वाशी, मुंबई

मुंबईच्या वाशी परिसरात राहणारे अभ्यासी प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी एकत्र येतात. पहिले एकत्रीकरण बंधू रामनय्या यांच्या निवासस्थानी 'प्रार्थना' या विषयावर झाले. समूह–चर्चा होत असताना महत्वाच्या मुद्यांची टिपणे काढण्यात आली. प्रत्येक सहभागी अभ्यासीने वाचन केले, त्यावर विचार केला तसेच एक ते दोन मिनिटात आपले विचार मांडले. कार्यक्रमाच्या शेवटी दहा मिनिटे उत्कट आणि सखोल असे प्रार्थना ध्यान झाले.

असा कार्यक्रम निरनिराळ्या अभ्यासींच्या घरी प्रत्येक वेळी वेगवेगळा विषय घेऊन आयोजित केला जावा असे निश्चित करण्यात आले आहे. सुरुवातीला सहज मार्ग साधना पद्धतीवर चर्चा होईल आणि मग चर्चेचा ओघ सहज मार्गाच्या शिकवणुकीच्या सूक्ष्म बाजूंवर आणून त्यावर विचार मंथन होईल असे ठरविण्यात आले आहे.

### गुलबर्गा, उत्तर कर्नाटक

दि.७ नोव्हेंबर रोजी बंधू महेश देशपांडे यांच्या निवास स्थानी वीस अभ्यासी एकत्र आले होते. उपस्थितांनी 'सहेतुक आणि योग्य पद्धतीने साधना' या वरील पू. गुरुदेवांच्या भाषणाची सी.डी. पाहिली. जागतिक प्रार्थनेने कार्यक्रम समाप्त झाला. चहापानाच्या वेळी अभ्यासींमध्ये अनौपचारिक चर्चा रंगल्या. सर्व अभ्यासींनी अत्यंत दिव्य आणि प्रसन्न वातावरणाचा व गुरुदेवांच्या अस्तित्वाचा अनुभव घेतला.



### वडोदरा, गुजरात

वडोदरा येथील सुंदरवन सोसायटी येथे दि.१७ डिसेंबर, २०११ रोजी एका अभ्यासी गटाने 'सहनशीलता म्हणजेच चारित्र्य' या विषयावर एकत्रीकरणाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या आधी झालेल्या 'वर्तणूक' या विषयावरील मुद्यांचा आढावा घेऊन आणि काही क्षण गुरुदेवांचे स्मरण करून कार्यक्रम पुढे सुरू झाला. चर्चा जसजशी पुढे जाऊ लागली तसतसे अभ्यासी पूर्वीच्या परिस्थितीतील स्वत:च्या प्रतिक्षिप्त क्रियांविषयी विचार करू लागले. त्यावेळी प्रत्येकाला जाणवले की स्वत:मध्ये विधायक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न स्वत: केला पाहिजे. स्वत:चे बाह्य आणि अंतर्गत संतुलन राखण्यासाठी आपण स्वत:मध्ये एक अवकाश निर्माण केला पाहिजे. दुसऱ्याविषयी सहवेदना जाणविण्यासाठी आपले हृदय खुले असले पाहिजे. यामुळे प्रत्येक परिस्थिती आपल्याला सकारात्मक आणि समर्पित भावाने हाताळता येईल. थोडक्यात, वर्नर एडहार्ड म्हणतात त्याप्रमाणे,"सदैव आणि कोणत्याही परिस्थितीमध्ये आपल्यामध्ये आपल्या जीवनाची गुणवत्ता बदलविण्याची क्षमता असते" अशी आपल्या चारित्र्याची मशागत व्हावी.

'आपण आपल्या जीवनाच्या प्रत्येक क्षणात आणि सूचनांत विचारांच्या तरलतेचे ध्येय ठेवावयास हवे' या मुद्यावर कार्यक्रमाची समाप्ती झाली. यामुळे अंतरात्म्याचा हलकेपणा जाणवेल आणि एका प्रगाढ शांततेचा अनुभव येईल.

### चेन्नई, युवक सभा

#### नेत्रमपल्ली आश्रम



१८ ते ३० वयोगटातील अभ्यासींचा एकत्रीकरण कार्यक्रम दि. १५ व १६ ऑक्टोबर या दिवशी नेत्रमपल्ली आश्रमामध्ये संपन्न झाला. 'आध्यात्मिक यात्रा' या नावाने ५५ तरूण अभ्यासी एकत्र आले, आणि बस प्रवास करून चेन्नई येथून नेत्रमपल्लीला पोहोचले. या यात्रेत पाच प्रशिक्षकही सहभागी झाले होते. या प्रशिक्षकांनीही विविध सत्रांमध्ये भाग घेतला.

नेत्रमपल्ली गावात सकाळी फेरफटका मारून कार्यक्रम सुरू झाला. 'मिशन : एक भव्य आध्यात्मिक कृती' या विषयावर एक सादरीकरण करण्यात आले आणि मग 'पू. गुरुदेवांचे ध्येय पूर्ण करण्यासाठी अभ्यासीची भूमिका काय असावी?' या विषयावर चर्चा झाली. यानंतर माहितीप्रद आणि मनोरंजनात्मक अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. 'गुरुदेवांशी असणारे नाती' यावर आणि 'गुरुदेवांप्रती प्रेम कसे उत्पन्न करावे' यावर सगळ्यांनी आपले विचार व्यक्त केले. सहजमार्ग साहित्यावर आधारित एका गमतीदार दार प्रश्नमंजूषेमुळे आणि समूह–खेळांमुळे कार्यक्रमास बहार आली. यानंतर बागेमध्ये काहीना काही काम करून कार्यक्रमाची सांगता झाली.

सहभागी अभ्यासींना गुरुदेवांची एक प्रतिमा भेट देण्यात आली. या कार्यक्रमामुळे, नेत्रमपल्ली आश्रमाच्या पवित्र आणि अप्रतीम अशा वातावरणात सर्वच उपस्थित जणू प्रभारीत आणि प्रफुल्लित झाले.







## मानवाचे एकीकरण या वरील कार्यशाळा

### ग्वालियर, मध्य प्रदेश

दि.१४ ते १६ ऑक्टोबर च्या दरम्यान ग्वालियर येथे विभागीय स्तरावर 'मानवाचे एकीकरण' या विषयावर सुमारे ५४ प्रशिक्षणार्थीसाठी तीन दिवसांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. दि. १४ पासून अभ्यासी येण्यास सुरवात झाली. त्यांच्याकरिता नोंदणी आणि वैयक्तिक सिटींगचे आयोजन करण्यात आले. संध्याकाळच्या सत्संगानंतर बंधू नरेन सिंग यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

दुसऱ्या दिवशी होशंगाबाद येथील बंधू कमल वाधवा, बंधू योगेश खंडेलवाल आणि बंधू राम किशोर यांनी विश्व बंधुत्वाच्या वृद्धिसाठी 'एक विश्व, एक मानवता' या विषयांवर एक सत्र आयोजित केले. भोपाळ येथील बंधू आर.के.श्रीवास्तव व त्यांच्या चमूने 'चारित्र्याची जडण-घडण' या विषयावर आधारित एका सत्राचे आयोजन केले होते. ही सत्रे परस्परांमध्ये संवाद घडवून आणणारी तसेच सहभागींना मनन करण्यास मुभा देणारी होती. संध्याकाळची वेळ वैयक्तिक सिटींग, सत्संग व रात्री ९ च्या प्रार्थनेनंतरच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी राखीव ठेवण्यात आली होती.

दि. १६ रोजी सकाळच्या सत्संगानंतर बंधू शिरीष यांनी 'हृदयीचे बोल-२००७' या पुस्तकातील काही पानांचे वाचन केले. बंधू विकल्प (विभाग प्रमुख) यांनी अभ्यासींना संबोधित केले व त्यांना प्रोत्साहित केले. प्रशिक्षणार्थींनी आश्रमाच्या बांधकामाला प्रारंभ झालेला पाहिला. शेवटचे सत्र 'त्यांच्या सोबत जोडले जाणे' या विषयावर होते व त्याचे आयोजन ग्वालियर येथील बंधू शिवकुमार व त्यांच्या संघाने केले होते. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन बंधू शिवकुमार, बंधू मनु चोप्रा, भगिनी अर्चना व भगिनी वंदना यांनी केले.

## मुलांचे कार्यक्रम

### बरेली, उत्तर प्रदेश

दि. १४ ते १६ नोव्हेंबर रोजी बरेली केंद्रात (१० ते १६ वयोगटातील) मुलांसाठी तीन दिवसीय कार्यक्रम आयोजित केला होता. बंधू जी.एम.भटनागर यांनी सत्राची सुरुवात केली व आपल्या प्राचीन ग्रंथातील मूल्ये परत आणण्याविषयी भाष्य केले. सायंकाळी ३ ते ६ वाजेपर्यंत असणाऱ्या या कार्यक्रमाच्या प्रत्येक दिवसाचा प्रारंभ मिशनच्या प्रार्थनेने झाला. तेथे 'स्वत:विषयीची जागरुकता व स्वत:चे नियोजन', 'आपण सर्व एकसारखे आहोत', 'आरोग्य व ऐक्य' आणि 'सत्य व धैर्य' या विषयांवर भाषणे झाली. या तीन दिवसात बंधू संजीव, बंधू प्रविण, बंधू रवींद्र, भगिनी बिमला, भगिनी शशी आणि इतर स्वयंसेवकांच्या सहाय्याने चित्रकला, रंगकाम, प्रश्नमंजुषा आणि गायन इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन केले गेले. रेल्वे सुरक्षा दलाचे कामकाज, आरोग्य व प्रतिबंधक उपाययोजना, विक्रेता यंत्र (व्हेंडींग मशीन) व त्याचे उपयोग या वरील भाषणे मुलांसाठी माहितीपूर्ण होती. कर्नल नितीश यांनी उत्तमप्रकारे संपादन केलेल्या चित्रफीतींद्वारे, देशप्रेम, स्वदेशाभिमान, राष्ट्रगीताचा उगम, प्रतिष्ठा, धैर्य, नेतृत्व आणि नैतिक मूल्ये यावर केलेले सादरीकरण श्रोत्यांमधील सर्वांना हृदयस्पर्शी वाटले. या कार्यक्रमामुळे सर्व मुले प्रेरीत आणि प्रोत्साहित झाली होती.

## क्रीडा दिवस

### पुणे, महाराष्ट्र

दि.८ व ९ आक्टोबर रोजी नांदेड फाटा आश्रमात बंधू रामनाथ यांनी पुढाकार घेऊन विविध क्रीडा उपक्रम आयोजित करुन एक आश्चर्यजनक सप्ताह समाप्ती केली. पहिला दिवस युवकांसाठी (१८-३० वयोगट) आणि दुसरा दिवस लहान मुले व ३० वर्षावरील अभ्यासींसाठी होता.

फलक, गुरुदेवांची विविध खेळ खेळत असल्याची छायाचित्रे, उध्दरणे, आणि फुगे सर्व काही तयार होते. शनिवारची सुरुवात क्रिकेटच्या खेळाने मोठ्या जोमाने व उत्साहाने झाली. हा सामना सर्वांना संकोच सोडून एकत्र आणणारा ठरला. यानंतर लिंबू शर्यत, पुस्तक ठेऊन तोल सांभाळण्याची शर्यत, कॅरम आणि बुद्धीबळ यासारखे इतर खेळ झाले. स्वयंसेवकांनी बनवलेल्या अल्पोपाहार व दुपारच्या जेवणानंतर सर्वांनी विश्राती घेतली.

रविवारच्या सत्संगानंतर हेच सर्व खेळ ३० वर्षावरील अभ्यासींनी खेळले. या उपक्रमाने अभ्यासींमधल्या खिलाडूवृत्तीला खत पाणी मिळाले आणि सर्वांमधे ऐक्य व बंधुभाव निर्माण केला.



### तिरुपुर, तामिळनाडू

दि. १४ नोव्हेंबर रोजी तिरुपुर मधील चेट्टीपालयम योगाश्रम येथे बालदिवस मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. जवळपासच्या अधिकाधिक मुलांना येणे शक्य व्हावे म्हणून या कार्यक्रमाची निमंत्रणे आधीच देण्यात आली होती.

कार्यक्रमाची सुरुवात संध्याकाळी ५ वाजता झाली. मुलांच्या वयोगटानुसार खेळांचे आयोजन करण्यात आले होते. सर्वांनी उत्साहाने यात भाग घेतला. बंधू सुंदरसन यांनी सहजमार्गावरील एका विशेष प्रश्नमंजुषेचे आयोजन केले होते. या प्रश्नमंजुषेत प्रेम, शिस्त व नीतिमत्ता इत्यादि विषयावरील प्रश्न होते. विभाग प्रमुख बंधू टी.व्ही. विश्वनाथ राव, आश्रम व्यवस्थापक बंधू सुब्बुरथीनम, बंधू मारप्पन आणि भगिनी सरला यांनी मुलांना बक्षिसे दिली. सर्वांना रात्रीचे जेवण देण्यात आले. मुलांसोबत आलेल्या पालकांनी आश्रमाच्या या उपक्रमाचे कौतुक केले. बऱ्याच जणांनी सहजमार्गात येण्याची उत्सुकता दर्शवली. अध्यात्मिक वातावरणात अशा प्रकारचा उपक्रम भरविण्यात आल्याचे महत्व जाणून बऱ्याच जणांनी असे उपक्रम भविष्यात सुध्दा करावेत असे मत व्यक्त केले.

# पूर्ण दिवसीय कार्यक्रम


कडप्पा


मंगलोर

## कडप्पा, आंध्र प्रदेश

दि. ४ डिसेंबर २०११ रोजी आंध्र प्रदेश मधील कडप्पा केंद्रामध्ये एक पूर्ण दिवसीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या मध्ये सुमारे ३१ अभ्यासी सहभागी झाले होते. या कार्यक्रमात नुकत्याच प्रकाशित झालेल्या सतत स्मरणच्या अंकातील चारित्र्याची जडण–घडण आणि खरी साधना ह्या दोन विषयांचा अंतर्भाव करण्यात आला होता. ज्या अभ्यासींना इंग्रजी समजत नाही अशांना या कार्यक्रमाचा खूप लाभ झाला कारण बरीचशी चर्चा त्यांच्या प्रादेशिक भाषेत, तेलगु मधे झाली.

सहजमार्गाचे महत्व सर्वांना सांगून आपल्या जीवनाच्या ध्येयापर्यंत पोहोचण्याची संधी सर्व बंधु – भगिनींना देणे या संकल्पनेवर आधारित एक नाटक मुलांनी सादर केले. या दिवसाची सांगता या नाटकाने झाली.

## मंगलोर, द. कर्नाटक

माझे गुरुदेव या विषयावर एक पूर्ण दिवसीय कार्यक्रम दि. ४ डिसेंबर २०११ रोजी मंगलोर केंद्रात आयोजण्यात आला होता. अभ्यासींना याची तयारी करण्याबद्दल दोन आठवडे आधीच सांगण्यात आले होते. सत्संगानंतर गुरुदेवांच्या भाषणाची ध्वनीफीत ऐकवण्यात आली. माझे गुरुदेव या पुस्तकातील विषयांवर तयारी करुन आलेल्या अभ्यासींची भाषणे झाली. दुपारी मणपाक्कम येथे झालेल्या युरोपियन चर्चासत्राची डि.व्ही.डी. दाखविण्यात आली. त्यानंतर सत्संगाचे महत्व हा प्रशिक्षणाचा कार्यक्रम मुंबई केंद्रातील दोन युवा अभ्यासींनी संचालित केला.

सत्राची सुरुवात प्रार्थनेने झाली व नंतर अभ्यासींना दोन समूहात विभागले गेले आणि नियमितपणे सत्संगास उपस्थित राहू न शकण्याच्या कारणांचा अंतर्मुख होऊन विचार करण्यास सांगण्यात आले. ती कारणे नंतर सर्वांना सांगण्यात आली. सत्संगाचे महत्व याविषयावरील गुरुदेवांच्या विधानांचे सादरीकरण दाखवण्यात आले आणि त्यानंतर आत्मपरिक्षण व चर्चा झाली.

## विरुधुनगर, तामिळनाडू

दि.१६ ऑक्टोबर रोजी चिन्नावल्लीकुलम येथील विरुधुनगर आश्रम येथे एक दिवसीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याकरिता स्थानिक व जवळपासच्या केंद्रातून सुमारे ४० अभ्यासी जमले होते. सकाळच्या ७.३० च्या सत्संगानंतर व अल्पोपाहारानंतर सर्व अभ्यासी कार्यक्रम सुरु होण्याची उत्सुकतेने वाट बघत होते.

आधीच्या महिन्यातील एक दिवसीय कार्यक्रमात झालेली चर्चा पुढे सुरु ठेऊन, अभ्यासींना दोन समूहात विभागले गेले आणि प्रत्येक समूहाने अधिक चांगला अभ्यासी होण्यासाठी स्वत:ला बदला या विषयावर चर्चा केली. चर्चेच्या शेवटी समूह नेत्यांनी ठळक मुद्दे थोडक्यात सांगितले.

यादरम्यान बऱ्याच मुद्यांवर चर्चा झाली. या कार्यक्रमात गुरुदेवांची उपस्थिती व मार्गदर्शन जाणवल्याची वस्तुस्थिती बऱ्याच अभ्यासींनी व्यक्त केली. संपूर्ण दिवसाची सांगता संध्याकाळच्या सत्संगाने झाली.

## हुबळी, उ. कर्नाटक

दि. १३ नोव्हेंबर रोजी तरुणांनी कल्पिलेला व सराव केलेला कार्यक्रम प्रदर्शित केला. सत्संग व न्याहारी नंतर अभ्यासी व मुमुक्षु यांच्यात कृत्रिम वादविवाद झाला. हा वादविवाद २ तास चालला व तो विनोदी, करमणूक करणारा व बोधप्रद होता.

आपल्या पद्धतीशी संबंधित नसलेली एक चित्रफीत दाखविण्यात आली व उपस्थितांची समूहामध्ये विभागणी करून या चित्रफीतीतील सहज मार्गाच्या सादरीकरणावरुन एक घोषवाक्य तयार करण्यास सांगण्यात आले. दुपारच्या जेवणानंतर तरुणांनी सादर केलेल्या नाटिकेमुळे विविध धर्माच्या संस्थापकांनी सारख्याच गोष्टी सांगितलेल्या आहेत ही वस्तुस्थिती समोर आली. त्यास दृष्ये व पार्श्वसंगीताची साथ होती. प्रत्येकाने कार्यक्रमाचा आनंद घेतला.

## बेल्लारी, उ.कर्नाटक

दि. ६ नोव्हेंबरला सकाळच्या सत्संगानंतर अभ्यासी व मुलांनी सृष्टी उद्याना कडे प्रयाण केले. बेल्लारी केंद्रातील तीन अभ्यासी चारित्र्याची घडण (तेलगु) या प्रशिक्षण कार्यक्रमात क्रेस्ट खरगपुर येथे सहभागी झाले होते. त्यांनी या कार्यक्रमाचे व प्रशिक्षण कार्यक्रमातील सहभागाचे महत्व विषद केले. त्यानंतर सर्व अभ्यासींनी उचला व बोला या उपक्रमात भाग घेतला. दुपारच्या जेवणानंतर मुलांनी प्रश्नमंजुषा हा कार्यक्रम संचालित केला. त्यानंतर मुलांनी आयोजन केलेला सांस्कृतिक कार्यक्रम झाला. संध्याकाळी चारच्या सत्संगानंतर या कार्यक्रमाची सांगताझाली.



विरुधुनगर


बेल्लारी



## लय योग आश्रम येथील उद्घाटन समारंभ

### सारनाथ, वाराणसी

गुरुदेवांनी सारनाथ, वाराणसी येथे नव्याने उभारण्यात आलेल्या लया योग आश्रमाचे उद्घाटन चेन्नई आणि वाराणसी दरम्यान एका थेट व्हिडिओ लिंकद्वारे दि.४ डिसेंबर २०११ रोजी केले. बंधू उमाशंकर बाजपेयी,सचिव, न्यायमूर्ती आर.आर.आर.के. चतुर्वेदी, बंधू आशिष सिंग, बंधू ए.के. गर्ग आणि बंधू वाय. एन. प्रसाद यावेळी उपस्थित होते.

प्रात: ६.३० वाजता सर्व अभ्यासी (सुमारे १०००) ध्यानकक्षात जमा झाले. जसे पडद्यावर गुरुदेव झळकले तसे सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने भरुन गेले. गुरुदेवांच्या दर्शनाने सर्व उपस्थित अत्यंत प्रफुल्लित झाले. गुरुदेवांनी बंधू बाजपेयींना स्मृति–शिला उघड करण्याचा आदेश दिला व त्यांनी ध्यानकक्ष पूज्य बाबूजी महाराजांना समर्पित केला तसेच अभ्यासींना ध्यानासाठी सभागृहाचा उपयोग करण्याची अनुमती दिली. ते म्हणाले, "सहजमार्ग हा प्रेमाचा मार्ग आहे. आपण या स्थानाचा उपयोग आपल्या आध्यात्मिक उन्नतीसाठी करावा. तिरस्काराला सहजमार्गात स्थान नाही". ह्या दृक–श्राव्य संवादाच्या पद्धतीवर भाष्य करताना ते म्हणाले की या वैज्ञानिक युगात आपण विभक्त नसुन एक आहोत.

वाराणसीचे केन्द्रप्रमुख डॉ. प्रसन्ना कुमार यांनी सर्वांचे स्वागत केले आणि गुरुदेवांनी दिलेल्या आशीर्वादाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. बंधू बाजपेयींनी 'प्रेमाचे महत्त्व' विस्तृतपणे स्पष्ट केले. बंधू एन. पी. सिन्हा यांनी लया योग आश्रमाचे संक्षिप्त इतिवृत्त सादर केले. द्वितीय सत्रात इतर केन्द्रांच्या अभ्यासींची भाषणे झाली. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम आणि सायंकालीन सत्संग झाला.

# अधिघोषणा

### चेन्नईचे नवीन केन्द्रप्रमुख

चेन्नई हा एक नवीन विभाग(२सी) असेल आणि बंधू कप्तान विनीत सिंग राणावत हे केंद्रप्रमुख असतील.

### एकोज वार्तापत्राचे अनुवादक

एकोज वार्तापत्र प्रादेशिक भाषांमधून प्रकाशित होते. इंग्रजीमधून त्या प्रादेशिक भाषांमधे भाषांतर करण्याकरिता तुम्हाला जर स्वयंसेवक अनुवादक व्हायचे असेल तर कृपया येथे ईमेल करा. in.newsletter@srcm.org

### वर्गणीदारांसाठी ई–मेल आयडी (Email Id)


वार्तापत्राचे वितरण करताना याहू व रेडीफमेल सर्व्हरमध्ये आम्हाला अडथळे येत आहेत. जर आपण याहू(Yahoo) वा रेडीफमेल (Rediffmail ID) आयडी असणारे वर्गणीदार असाल, तर कृपया वर्गणी रद्द करावी व दुसरा ई–मेल आयडी वापरून पुन्हा वर्गणीदार बनावे. तसदीबद्दल क्षमस्व.

### मणपाक्कम आश्रमाला भेट देण्याबद्दल


रशिया तसेच पूर्वीच्या सी. आय. एस. देशांमधील अभ्यासींकरिता बाबूजी मेमोरियल आश्रम, मणपाक्कम येथे १७ ते २४ जानेवारी, २०१२ दरम्यान एका चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. इतर केंद्रांच्या अभ्यासींना अशी विनंती करण्यात येते की त्यांनी या काळात मणपाक्कम येथे भेट देऊ नये.

# नवीन प्रकाशने


पूज्य गुरुदेवांनी नववर्षदिनी मणपाक्कम येथे खालील पुस्तकांचे प्रकाशन केले





डिसेंबर २०१० दरम्यान मणपाक्कम येथे झालेल्या युरोपिय परिसंवादाची चलतचित्र – हेवन (Heaven) या डि.व्हि.डि. मध्ये उत्कृष्टपणे अंतर्भूत करण्यात आली आहेत. स्पिरिचुअल हायरार्की पब्लिकेशन ट्रस्टची ही एक विशेष निर्मिती आहे.




सहज मार्गाची तत्वे– खंड १२ –तामिळ



सहज मार्गाची तत्वे– खंड १४ –तेलगु




हृदयीचे बोल– २००२– खंड २– इंग्रजी




वृक्षाचे फळ – मराठी

पुणे आश्रम

# प्रकाशाचे केंद्र

"आनंद – अर्थातच आपण आनंदी राहिले पाहिजे, पण आपण हे विसरतो की गुरुदेवांनी आपल्या अनेक संदेशांमध्ये सांगितले आहे की अभ्यासींनी नेहमीच आनंदी राहिले पाहिजे, अधून मधून नव्हे, आणि आपल्या समोर पानशेत तलाव आहे आणि सुंदर सूर्योदय दिसतो तेव्हाच नव्हे. अत्युत्तम! आपल्या हृदयात असणाऱ्या आंतरिक निसर्गावर आपण प्रेम केले पाहिजे व या अर्थाने आपण खरोखरच निसर्गप्रेमी आहोत. त्या आंतरिक निसर्गाचेच प्रतिबिंब म्हणून बाह्य निसर्ग दिसतो किंवा जर आत असेल तरच बाहेर प्रतिबिंबित होतो."

पुण्यामध्ये व सभोवताली सहजमार्ग कुटुंब जसजसे वाढत गेले तसतसे पुण्यामध्ये आश्रमाची गरज भासू लागली. पुण्यामध्ये आश्रमाच्या बांधकामाची परवानगी २००१ मध्ये मागण्यात आली व ती गुरुदेवांनी तत्परतेने दिली.

जमिनीचे नोंदणीकरण जानेवारी २००१ मध्ये झाले आणि मुलांच्या केंद्राव्यतिरिक्त आश्रमाचे बांधकाम २००४ च्या सुरुवातीला पूर्ण झाले. मुलांच्या केंदाचे बांधकाम जुलै २००४ मध्ये करण्यात आले. सिंहगड रोडलगतच्या शांततापूर्ण परिसरात ३९१९ चौ. मी. विस्तारामध्ये हा आश्रम प्रस्थापित आहे.

आश्रम तलावाच्या बाजूला असल्याने येथील वातावरण थंड, शांत व रमणीय बनले आहे. हा आश्रम पूणे रेल्वे स्थानकापासून सुमारे १५ कि.मी. अंतरावर असून तो सार्वजनिक वाहतुकीने पुण्याला जोडलेला आहे.

नांदेड आश्रम हा पानशेत रीट्रीट केंद्रापासून फक्त १० कि.मी. अंतरावर असल्याने स्वयंसेवक व अभ्यासींना या दोहोंमध्ये वहिवाट सुकर झाली आहे.

गुरुदेवांनी फेब्रुवारी २००४ मध्ये पुण्याला भेट दिली आणि आश्रमाच्या बांधकामाच्या शेवटच्या टप्प्याची पाहणी केली. त्यांनी केंद्र प्रमुखांना बांधकाम संपल्यावर ताबडतोब सत्संग सुरु करण्याची सूचना दिली व त्यामुळे येथे पहिला सत्संग ४ एप्रिल २००४ रोजी घेण्यात आला.

आश्रमाचा ध्यान कक्ष सुमारे २३२५ चौ फूट असून त्यामध्ये सुमारे २५० अभ्यासी बसू शकतात. सन २००९ मध्ये अजून २०० अभ्यासी बसू शकतील अशाप्रकारे ध्यानकक्षाचा तात्पुरता विस्तार करण्यात आला. इतर सुविधांमध्ये एक स्वयंपाकघर, मुलांचे केंद्र , एक शौचालय व पहिल्या मजल्यावर रखवालदाराची राहण्याची खोली तसेच वाहनतळ इत्यादींचा समावेश आहे. हिरवीगार हिरवळ व विविध फळझाडांनी आश्रमाच्या इमारती वेढल्या आहेत.

गुरुदेवांनी आपल्या अनेक भेटींदरम्यान या आश्रमामध्ये सत्संगांचे संचालन केले आहे. आगामी विकासाच्या दृष्टीने आश्रमाची देखभाल संघटना गुरुदेवांच्या संमतीसाठी आश्रमाच्या विस्ताराचा एक मोठा प्रकल्प तयार करण्यात मग्न आहे.















To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org

© 2011 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. "Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.